LAVASA

**कृपया प्रसिद्धीसाठी**

# लवासा सिटीच्या `फूड-आर्ट-म्युझिक अँड एन्टरटेनमेंट' फेस्टिवलला (फेम 2014) जबरदस्त प्रतिसाद!

- **15,000हून अधिक चाहते तीन दिवसांच्या फेस्टिवलसाठी लवासा सिटीमध्ये**

**लवासा सिटी, 3 जून, 2014 : भारतातील पहिले सुनियोजित थंड हवेचे स्थळ असलेल्या लवासा सिटीमध्ये गेल्या वीकेण्डला 15,000हून अधिक संगीत रसिक, कलांचे चाहते, खादय़पदार्थ आणि वाइनप्रेमी तसेच उन्हाळी सुटीतले उत्साही वीर फेम 2014 फेस्टिवलसाठी गोळा झाले होते. `फूड-आर्ट-म्युझिक अँड एन्टरटेनमेंट' फेस्टिवल 30 मे ते 1 जून, 2014 या काळात आयोजित करण्यात आला होता. त्यात पर्यटक-प्रेक्षकांना कला, संगीत, नाटय़, जागतिक खादय़पदार्थ, शॉपिंग आणि आर्ट वर्कशॉप्सची मेजवानी मिळाली.**

**तीन दिवसांच्या या फेस्टिवलच्या काळात निवासी विक्री आणि बुकिंग्जमध्ये जवळपास 50 टक्क्यांची वाढ झाली. त्यामुळे लवासा सिटीमधील अतिशय चातुर्याने डिझाइन केलेल्या अपार्टमेंट आणि व्हिलाजना वाढीव मागणी आहे, यावर शिक्कामोर्तब झाले.**

**फेम 2014च्या यशस्वी आयोजनाबद्दल लवासा कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आणि सीईओ नेथन अँड्रय़ूज म्हणाले, ``फेम 2014ला मिळालेल्या तुडुंब प्रतिसादामुळे आम्ही अतिशय खूष झालो आहोत. लवासा शहर हे आपल्या रहिवाशांना आणि अभ्यागतांना अनोखा अनुभव देणारे पर्यटकांच्या पसंतीचे पर्यटनस्थळ बनावे, यासाठी आम्ही करत असलेल्या प्रयत्नांवर या प्रतिसादाच्या रूपाने शिक्कामोर्तबच झालेले आहे. भविष्यात आम्ही फेम हा लवासाच्या कॅलेंडरमधील एक वार्षिक सोहळा बनवण्याचे ठरवले आहे."**

**शिबानी कश्यप आणि मामे खान, द क्लासिकल क्विन्टेट, शरॉन प्रभाकर, निलाद्री कुमार आणि डीजे अंकिट्रिक्स यांच्या कार्यक्रमांच्या मालिकेने शुक्रवारी या महोत्सवाला उत्साहात सुरुवात झाली. ग्रेप स्टॉम्पिंग (वाइनसाठी द्राक्षांची पायांनी मळणी), रस्त्यावरचे बाजार, वाइन आणि बीअर टेस्टिंग, साल्सा आणि झोरबा डान्सिंग, कला प्रदर्शने, स्ट्रीट डान्सिंग, थिएटर परफॉर्मन्स आणि कराओके यांनी तीन दिवसांच्या या सोहळय़ाचे कॅलेंडर गच्च भरले होते.**

**पुढच्या दिवसांमध्ये राकेश चौरासिया, रवी चारी, फझल कुरेशी, अग्नी, जो अल्वारेझ आणि लुई बँक्स या कलावंतांनी भारतीय शात्रीय संगीतापासून जॅझ आणि रॉक संगीतापर्यंतच्या वेगवेगळय़ा शैलींचे घडवलेले आविष्कार प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे ठरले.**

**इटालियन ऑपेरा गायक जिओकोन्डा व्हेसिचेल्ली यांच्यामुळे प्रेक्षकांना क्लासिकल ऑपेराची ओळख झाली. शरॉन प्रभाकर, तारा सुतारिया आणि भरत दाभोळकर यांनी रंगमंचावर केलेल्या सादरीकरणानी फेस्टिवलच्या वैविध्यपूर्ण कार्यक्रमांमध्ये भर घातली.**

एकीकडे संगीत सुरू असताना दुसरीकडे नामवंत कलाकारांनी त्यांच्या कलाकृती लवासाच्या प्रोमेनाडवर प्रदर्शित केल्या आणि त्याचवेळी त्यांच्या व इतर कलाशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सृजनशील कला आणि चित्रकला यांचा आस्वाद आणि शिक्षण घेण्याची संधीही फेस्टिवलमध्ये सहभागी झालेल्यांना मिळाली.

याशिवाय या फिएस्टाने चीज टेस्टिंग, स्ट्रीट फूड, लाइव्ह ग्रिल आणि कुकिंग काउंटरर्सबरोबर मल्टि-कोर्स मील्स आणि आघाडीच्या शेफने तयार केलेले जगभरातील राजेशाही स्प्रेड यांनाही मंच दिला होता. या खादय़पदार्थांच्या जोडीला अभ्यागताना स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील सर्वोत्कृष्ट वाईन आणि स्थानिक ब्रुअरींमध्ये तयार झालेली बीयरही चाखायला मिळाली.

लवासाविषयी : लवासा हे भारतातील पहिले नियोजित थंड हवेचे ठिकाण आहे जिथे नागरिक निसर्गाच्या सानिध्यात राहून काम करू  शकतात, शिकू शकतात आणि खेळू शकतात. लवासा कॉर्पोरेशन लिमिटेडतर्फे (एलसीएल) विकसित करण्यात आलेले हे एक खास शहर आहे. 10,000 हेक्टर्सवर वसलेले हे शहर आधुनिक शहरीकरणाच्या तत्वावर आधारलेले आहे. मुंबईहून तीन तासांच्या तर पुण्याहून तासाभराच्या रस्त्याच्या प्रवासाने लवासाला पोहोचता येते. भविष्यात पाहुणचार, पर्यटन, शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक संशोधन आणि कारखाने यासारख्या क्षेत्रात लवासातर्फे जागतिक नेत्यांची एक फळीच उभारली जाणार आहे. या थंड हवेच्या ठिकाणी भाडेतत्वावरील घरे, अपार्टमेंट आणि व्हिलाजच्या स्वरूपात काही पारंपरिक आणि कालातीत वास्तुशात्राचे नमुने पाहायला मिळतात. अतिशय उच्च दर्जाच्या सोयीसुविधांमुळे हे शहर इथल्या नागरिकांना एक सुंदर आयुष्य जगण्याची संधी देते.

अधिक माहितीसाठी कृपया यांच्याशी संपर्क साधा :

**लवासा कॉर्पोरेशन लिमिटेड**
**श्री. अश्विन शेट्टी- 9967024293**
ashwin.shetty@lavasa.com
**श्री. अंकुल भावसार - 9820168842**
ankul.bhavsar@lavasa.com

**ऍडफॅक्टर्स पीआर**
**श्री. परीक्षित जोशी - 9833917030**
parikshit.joshi@adfactorspr.com
**श्री. निनाद सिद्धये - 9619500760**
ninad.siddhaye@adfactorspr.com